पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २२८**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २३/०६/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **२३/०६/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/ प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे नीता विलास

याशिवाय मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त(१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अति.आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.नाळे – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत – उप आयुक्त, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे – प्र.सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख, मा.आगळे – सहा.आयुक्त, मा.मुंढे – शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), मा.शिंदे- प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.ओंभासे, मा.मोरे, मा.पाटील, मा.पवार, मा.सेठीया, मा.वाघुंडे,

मा.पोरेड्डी, मा.काळे, मा.धुमाळ, मा.देसले – कार्यकारी अभियंता, मा.पानसरे, मा.दिलिप आढारी – प्रशासन अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.गोफणे – सहा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.४७) कोरोना विषाणू (कोविड-१९) चे काळात कामकाज करणा-या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह महापालिका रूग्णालय/दवाखाना येथील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना स्वतंत्र कोविड भत्ता अदा करणेबाबत.

विषय क्र.४८) सन २०२०-२०२१ या वर्षातील संचलन तूट व विविधप्रकारचे पासेसपोटी रक्कम अग्रिम अदा करणेबाबत. (जून २०२१)

----------

अ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२२६ दि.०९/०६/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२२७ दि.१६/०६/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ९७५९ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – प्रशासन

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.प्रशासन/९/कावि/२९४/२०२१, दि.२१/०५/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांची शिफारस विचारात घेवून –

श्री.गायकवाड किरण देवेंद्र, जनता संपर्क अधिकारी यांचेवर भा.दं.वि कलम ३०६, ३४ नुसार संगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे गु.रं.नं ११४/२०१३ दि.१८/०७/२०१३ अन्वये आत्महतेस प्रवृत केलेप्रकरणी फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल झाल्याने त्यांना दि.०७/०८/२०१३ च्या आदेशान्वये सेवानिलंबित करुन खातेनिहाय चौकशी सुरु करण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले होते.प्रकरणी चौकशी होवुन त्यामध्ये त्यांचेविरुध्द ठेवणेत आलेले दोषारोप शाबीत झालेले नाहीत. मा.जिल्हा सत्र न्यायालय संगमनेर दि.२५/११/२०१९ रोजीच्या न्यायनिर्णयाने प्रस्तुत प्रकरणी श्री.गायकवाड यांना भा.दं.वि कलम ३०६, ३४ व २३५(१) मधील दाखल गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता केलेली आहे. तथापि सदर न्याय निर्णयाविरुध्द अभियोग पक्षाने मा.वरिष्ठ न्यायालयात अपिल केलेले आहे. त्यानुसार दि.२६/०२/२०२० चे आदेशान्वये त्यांचे निलंबन रद्द करुन मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या अपिलाच्या अनुषंगाने होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन निलंबन रद्द करुन निलंबन कालावधी निलंबनाधीन ठेवणेत येवुन सेवेत पुनःस्थापित करणेत आलेले आहे.प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन पुढील नियमाधीन कार्यवाही करणेस हरकत नसल्याचा

अभिप्राय कायदा विभागाने दि.२९/०१/२०२० रोजी दिलेला आहे. वास्तविकतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(४) अन्वये कोणत्याही नगरपालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल तरच अशा जबर शास्ती आदेशाविरुध्द एक महिन्याच्या कालावधीत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी स्पष्ट तरतूद आहे.प्रकरणी निलंबन कार्यवाही ही प्रशासकिय कार्यवाही असुन अपचारी यांचेविरुध्द दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने त्यांना निलंबित करण्यात आलेले होते. सबब, श्री.किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी यांना मा.सत्र न्यायालय संगमनेर यांने दाखल गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता जरी केलेली आहे. तरी त्यांचेविरुध्द अभियोग पक्षाने मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अपिल दाखल केलेले असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री.गायकवाड यांना निलंबन कालावधीमध्ये उदरनिर्वाह भत्ता नियमानुसार अदा केलेला आहे.यास्तव त्यांचा निलंबन कालावधी विनावेतनी केल्याची कार्यवाही मे.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिनस्त केलेली असल्याने योग्य,रास्त व नियमाधीन असुन किरकोळ व सर्वसाधारण स्वरुपाची आहे.तरी प्रकरणाची वस्तुस्थिती विचारात घेवून अपील अर्ज फेटाळणेबाबत मा.अति.आयुक्त(१)यांची मागणी असली तरी, सदर प्रकरणी प्रशासन विभागाकडील आदेश क्र. प्रशा/९/कावि/१०१/२०२० दि.२६/२/२०२० अन्वये श्री.किरण देवेंद्र गायकवाड, जनता संपर्क अधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचे सेवानिलंबन रद्द करताना सेवानिलंबन कालावधी विनावेतनी केलेला आहे. सदर आदेशामुळे श्री. गायकवाड यांचे प्रशासकीय तसेच आर्थिक नुकसान होत असल्याने त्यांनी मा. स्थायी समिती यांचेकडे अपिल दाखल केलेले आहे. या अपीलाबाबत पारीत झालेल्या मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७८५६ दि.१६/१२/२०२० चे अनुषंगाने प्रशासन विभागाकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे निर्णय घेणेत येत आहे. श्री.किरण देवेंद्र गायकवाड यांचा सेवानिलंबन कालावधी विनावेतनी केल्याची कारवाई किरकोळ व सर्वसाधारण स्वरूपाची नसुन त्यांचे प्रचंड आर्थिक व प्रशासकीय नुकसान करणारी आहे. याशिवाय सेवाज्येष्ठता, वेतनवाढी, अंशदान पेंशन, वेतनश्रेणी यावर दुरगामी परिणाम करणारी असल्याने मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ७८५६ दि. १६/१२/२०२० चे अनुषंगाने प्रशासन विभागाकडील अहवाल अमान्य करण्यात येत आहे. तसेच श्री. गायकवाड यांचा सेवानिलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कर्तव्य कालावधी म्हणून ग्राह्य धरुन त्या कालावधीतील वेतन त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच निलंबन कालावधीतील नियमानुसार देय्य असलेले सर्व भत्ते, वेतनवाढी देणेस व नियमानुसार देय्य असलेले सर्व आर्थिक लाभ फरकासह श्री.किरण देवेंद्र गायकवाड, जनता संपर्क अधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच माहे जुलै २०१८ ते नोव्हेंबर २०१९ (सेवानिलंबन कालावधीतील) मधील त्यांना अदा न करणेत आलेला उदरनिर्वाह भत्ताही त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६०
विषय क्रमांक – ०२
दिनांक – २३/०६/२०२१
विभाग – विद्युत
सुचक – मा.संतोष कांबळे
अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.विमुका/६/कावि/३८९/२०२१, दि.०१/०६/२०२१

विषय- पुणे-आळंदी रस्त्यापासून च-होली-लोहगाव हद्दीपर्यंतच्या विकास आराखड्यातील रस्ता विकसित करणे व विद्युत विषयक काम करणेकामी (भाग 2 चेनेज 6/700 ते चेनेज 9/563 कि.मी.)

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६१
विषय क्रमांक – ०३
दिनांक – २३/०६/२०२१
सुचक – मा.शत्रुघ्न काटे
अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव –

विषय - मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३५ दि.१४/०५/२०२१

विषय क्र.३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६२
विषय क्रमांक – ०४
दिनांक – २३/०६/२०२१
सुचक – मा.अभिषेक बारणे
अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

विषय - मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३६ दि.१४/०५/२०२१

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६३
विषय क्रमांक – ०५
दिनांक – २३/०६/२०२१
सुचक – मा.संतोष कांबळे
अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

विषय - मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.३९ दि.१४/०५/२०२१

विषय क्र.५ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६४ | विषय क्रमांक – ०६
दिनांक – २३/०६/२०२१ | विभाग – ग क्षेत्रीय जलनि:सारण
सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.गक्षेका/जनि/कावि/३५२/२०२१, दि.१७/०५/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई यांत्रिकी पध्दतीने करणेकामी मे.आर्यन पंप्स ॲण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७४ दिनांक २८/०२/२०१९ नुसार करारनामा शर्तीनुसार दि.२७/०५/२०१९ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. तसेच व्दितीय वर्षाचा ठराव क्र.७२९० दिनांक १२.०८.२०२० नुसार सदर कामास आदेश देणेत आला आहे व कामाची मुदत दिनांक २६/०५/२०२१ पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. सदर निविदेचा कार्य कालावधी ०७ (सात) वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी देणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार एक वर्षानंतर भाववाढ फरक देय राहील. त्यानुसार ठेकेदाराने सदरचे काम प्रथम व व्दितीय वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. तृतीय वर्षासाठी (२६.०५.२०२२ पर्यत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात पान क्र.७६६ अ.क्र.७ वर र.रू.७३,००,०००/- तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार मा.स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला २ रे वर्षे कालावधीची मुदत दिनांक २६/०५/२०२१ रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे.आर्यन पंप्स ॲण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने). या कामास दिनांक २७/०५/२०२१ पासून २६/०५/२०२२ पर्यंत तृतीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व भाववाढ फरक एक वर्ष कालावधीनंतर अदा करणे व या कालावधीसाठी र.रू.१,२९,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोणतीस लाख फक्त) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६५ | विषय क्रमांक – ०७
दिनांक – २३/०६/२०२१ | विभाग – आरोग्य
सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/०९/कावि/९९/२०२१, दि.०७/०५/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकात शहरातील नद्यांमधील जलपर्णी काढणेकामीचे कामकाजाकरीता र.रु.२ कोटी ५० लाख इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार सद्यस्थितीत मे.साई फ्रेट प्रा.लि. या संस्थेचे सुरु असलेल्या कामकाजापोटी अंदाजे र.रु.१ कोटी २०

लाख इतकी रक्कम बील अदायगीपोटी देणे बाकी आहे. तसेच जलपर्णी काढणेचे कामकाज तातडीक स्वरुपाचे असल्याने नव्याने या कामाचे EOI प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सदर कामकरीता अंदाजे र.रु.४ कोटी इतकी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार एकूण होणारा अंदाजे खर्च हा र.रु.५ कोटी २० इतका आहे. तरी सदरचे कामकाजाच्या बिल अदायगीकामी अंदाजे र.रु.३ कोटी कमी पडत असल्याने, आरोग्य मुख्य कार्यालयाकडील "यांत्रिक पध्दतीने साफसफाई" या लेखाशिर्षावरील र.रु.४ कोटी ४० लाख या तरतूदीमधून "नदीपात्रातील जलपर्णी काढणे" या लेखाशिर्षावर र.रु.३ कोटी इतकी तरतूद वर्ग करणेस महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेची मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील मे.साई फ्रेट प्रा.लि. यांनी जलपर्णी काढणेचे काम केले नसलेने आता जलपर्णी काढावी लागत आहे त्यामुळे मे.साई फ्रेट प्रा.लि.यांनी काम केले आहे काय याची खातरजमा करावी व त्यांना कामाचे बील अदा करू नये व त्यासाठी कोणतीही रक्कम वर्गीकरण करू नये. चालू असणा-या कामासाठी सध्याची उपलब्ध र.रू.२,५०,००,०००/- इतकी तरतूद विचारात घेता वाढीव र.रू.२,००,००,०००/- इतक्या रकमेचे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६६ विषय क्रमांक – ०८

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७०९/२०२१, दि.०७/०६/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/106/2020-21 अन्वये प्रभाग क्र.६ मधील चक्रपाणी वसाहत, देवकर वस्ती व परिसरात स्थापत्य विषयक सुधारणेची कामे करणेकामी मे.हृषीकेश ज्ञानदेव घोडेकर नि.र.रू.44,98,049/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख अठ्ठयाण्णव हजार एकोणपन्नास फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,57,399/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,57,399/- पेक्षा 11.49% कमी म्हणजेच र.रु.39,45,244 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.18,372/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.40,650/- = एकुण र.रु.40,04,266/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६७ विषय क्रमांक – ०९

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य EWS

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्था/नि/EWS/५११/२०२१, दि.०९/०६/२०२१

विषय - JnNURM BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड पॅकेज क्र.७ अ मधील इमारतींची स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनि:सारण कामांची दुरुस्तीची कामे करणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार दि.०७/०७/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६८ विषय क्रमांक – १०

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य उद्यान

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/३४१/२०२१, दि.१०/०६/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.82/02/2020-21 अन्वये पिंपळे सौदागर आरक्षण क्र.३७१ ब येथील उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी एम.जे.कन्स्ट्रक्शन नि.र.रू.81,36,909/- (अक्षरी र.रु. एक्याऐंशी लाख छत्तीस हजार नऊशे नऊ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.81,09,508/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.81,09,508/- पेक्षा 38.11% कमी म्हणजेच र.रु.50,18,975/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,84,265/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.27,400/- = एकुण र.रु.52,30,640 /- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७६९ विषय क्रमांक – ११

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/०१/कावि/५५७/२०२१, दि.११/०६/२०२१

विषय – सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मराठी व ऊर्दु शिक्षक ६ महिन्या करीता नेमणूक करणे व जाहिरात देणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७०
विषय क्रमांक – १२
दिनांक – २३/०६/२०२१
विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शशिकांत कदम
अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१८/कावि/३३७/२०२१, दि.११/०६/२०२१

विषय – मनपाच्या नविन तयार करण्यात आलेल्या भोसरी, जिजामाता, थेरगांव व आकुर्डी रुग्णालयाकरीता आवश्यक द्रव ऑक्सिजन $O_2$ मेडीकल गॅस (Liquid Oxygen) पुरवठा करणेकामी वितरक नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७१
विषय क्रमांक – १३
दिनांक – २३/०६/२०२१
विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे
अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/७५९/२०२१, दि.११/०६/२०२१

विषय - प्रभाग क्र.32 मधील श्रीकृष्ण मंदीर ते बँक ऑफ महाराष्ट्र ते सांगवी फाटा पर्यंत व परीसरातील रस्ते अद्ययावत पध्दतीने विकसित करणेबाबत. (सन 2019-2020)

विषय क्र.१३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७२
विषय क्रमांक – १४
दिनांक – २३/०६/२०२१
विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.संतोष कांबळे
अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/२/कावि/२८७/२०२१, दि.११/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क्षयरोग, पोलिओ, गोवर-रुबेला, घटसर्प, डांग्या खोकला, टिटॅनस, हिमोफिल्स इन्फ्लुएंझा टाईप बी अशा आजारांसाठी बालकांचे लसीकरण केल्याने बालकांना सुरक्षित करता येते. त्यामुळे बालकांचे नियमित लसीकरण करणे आवश्यक असून महानगरपालिकेच्या वतीने कार्यक्षेत्रात" मिशन नियमित लसीकरण मोहिम" राबवत आहे. यामध्ये शून्य ते २ वर्ष वयोगटामधील लहान मुलांचे आणि सर्व गर्भवती महिलांचे लसीकरण करण्याचे उद्दीष्ट आहे. या लसीकरण मोहिमेबाबत नागरिकांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. याकामी शहरातील रेडीओ मिर्ची ९८.३ एफएम, रेडीओ सिटी ९१.१ एफएम, रेड एफएम ९३.५० एफएम आणि रेडिओ वन ९४.३० एफएम इ. रेडीओ वाहिन्यांद्वारे नागरिकांमध्ये ३० सेकंदाच्या जागृतीपर ऑडीओ क्लिप्स बनविणे व दिवसातून १० वेळा ७ दिवसांकरिता प्रसारित करणेकामी र.रु.३,८४,०९०/- (अक्षरी र.रु. तीन लाख चौ-याऐंशी हजार नव्वद फक्त) १८% GST सह इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७३ विषय क्रमांक – १५
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मध्य.सा.भां.,वैद्यकिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/७१४/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणू Covid-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागू करुन राष्ट्रीय आपत्ती घोषित करुन कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकरीता युध्दपातळीवर कामकाज करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणुचा(Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी दिनांक २५/०३/२०२१ रोजी कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम जम्बो रुग्णालय व्यवस्थापनाबाबत झालेल्या बैठकीस अधिन राहूनतातडीचे कामकाजास्तव M/s.Medbros Healthcare Pvt. Ltd., यांना कोरोना बाधित रुग्ण मरण पावल्यास त्यावर Expression of Interest मध्ये निर्देशित केलेप्रमाणे योग्य तो प्रोटोकॉल पाळुन मृतदेहासंबंधी कामकाज करण्यासाठी र.रु.२८,०२१/- प्रमाणे १६ कर्मचारी कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे उपलब्ध करुन देणेकामी प्रति महा र.रु.४,४८,३३६/- प्रमाणे दोन महिन्यांकरीता (दिनांक ३१/०३/२०२१ ते दिनांक ३०/०५/२०२१) येणा-या र.रु.८,९६,६७२/- (अक्षरी र.रु.आठ लाख शहाण्णव हजार सहाशे बहात्तर फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च वैदयकीय विभागाकडील वाय.सी.एम. रुग्णालय व अन्य रुग्णालयाची साफसफाई लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७४ विषय क्रमांक – १६
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – शहर आरोग्य नियंत्रण केंद्र
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सक्षनिके/क्षय/कावि/३१९/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचा-यांना जा.क्र.शक्षनिके/क्षय/कावि/१०१/२०२० दि.०१/०७/२०२० नुसार किमान वेतन माहे जुन २०२० पासुन लागु केलेले आहे. त्यासाठी स्थायी समिती दि.०७/१०/२०२० ठराव क्रमांक ७५३४ नुसार राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचारी यांना पि.चि.म.न.पाच्या किमान वेतन दरानुसार मंजुर निधी व्यतिरिक्त मनपा मार्फत होणा-या खर्चाच्या प्रतिपुर्तीस माहे जुन ते डिसेंबर २०२० अखेर मंजुरी घेण्यात आलेली आहे. तरी जानेवारी २०२१ ते ३१ मे २०२१ अखेर तसेच १ जुन २०२१ पासुन पुढील कालावधीसाठी प्रतिमाह किमान वेतन अदा करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमा व्यतिरिक्त अंदाजे र.रु.२,०७,०३३/- प्रतिमाह खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च प्रथमता कॉर्पोरेशन इंटीग्रेटेडहेल्थ ॲन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी बचत खाते क्र.०३२१०१०००७६८३

मधुन करण्यास व त्यानंतर वेतनातील फरक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कुटुंब कल्याण अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षकामधील मंजुर अनुदान र.रु.५,१४,००,०००/- मधुन प्रतिपुर्ती करणेकामी मान्यता मिळावी तसेच मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई यांच्या जा.क्र.राआसोमं/मनुष्यबळ कक्ष/वेतन सुसूत्रीकरण/५०३३३-५४१३०/२०२० दि.५ ऑक्टोंबर २०२० नुसार वेतन सुसूत्रीकरण प्रक्रीया राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार वेतन सुसूत्रीकरण प्रक्रीया राबवुन ज्या कर्मचा-यांना किमान वेतन लागु केलेले आहे अशा कर्मचा-यांचा माहे जुन २०२० पासुन वेतनातील फरक पिं.चिं.म.न.पा मध्ये भरण्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सुसुत्रीकरणानुसार मंजुर वेतन व पिं.चिं.म.न.पाचे किमान वेतन यामधील फरकाची रक्कम कुटुंब कल्याण अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामधुन प्रतिपुर्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७५ विषय क्रमांक – १७

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/२०१/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयसाठी सन २०२०-२१ च्या शैक्षणिक वर्षात इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना मोफत बसपास योजनोपोटी र.रू.९,२७,६८०/- (अक्षरी र.रू. नऊ लाख सत्तावीस हजार सहाशे ऐंशी फक्त) किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७६ विषय क्रमांक – १८

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.उप आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/१६/कावि/२७५/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.उप आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या क्ष-किरण विभागासाठी सी.आर.सिस्टीम उपकरण खरेदीकामी ई.नि.सु.क्र.32/2020-21 नुसार प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.मेडीटेक एजन्सीस, पुणे यांचे एकुण र.रु.16,90,000/- हे अंदाजपत्रकीय दर र.रु.23,00,000/- पेक्षा 26.52 टक्केने कमी व लघुत्तम आहेत. सदरचे दर स्विकृत करणेत आलेले असुन मे.मेडीटेक एजन्सीस, पुणे यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तरी सदर साहित्याच्या खरेदीसाठी येणा-या र.रु.16,90,000/- (अक्षरी र.रू.सोळा लाख नव्वद हजार फक्त) च्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७७ विषय क्रमांक – १९

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.उप आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/३८२/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.उप आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक जंतुनाशक/दुर्गधीनाशक टेमिफॉस 50% EC isi mark औषध खरेदीकरणे कामी ई.नि.सु.क्र.04-03/2021-22 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.लक्ष्मी केमी लाईम पेस्ट कंन्ट्रोलपुणे यांचे प्रती लिटर दर र.रु.1615/- नुसार 1010 लिटर साठी एकुण र.रु.16,31,150/- कमी करून दिलेले दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.16,66,500/- पेक्षा 2.12% ने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन संबधीत पुरवठादारा बरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत आलेला आहे. तरी सदर खरेदीस येणा-या र.रू.16,31,150/- (अक्षरी र.रू.सोळा लाख एकतीस हजार एकशे पन्नास फक्त) च्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७८ विषय क्रमांक – २०

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१०६३/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध रुग्णालये,जंम्बो कोविड सेंटर, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांवर वैद्यकिय उपचाराकरीता आवश्यक असणारे Inj.Remdesivir 100 Mg तातडीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.सद्यस्थितीत मनपाचे विविध रुग्णालये तसेच कोवीड हाँस्पीटल करीता आवश्यक असणारे Inj.Remdesivir 100 Mg– 15,000 Vials खरेदी करणेकामी ई-निविदा क्र.०३/२०२१-२२ नुसार लघुत्तम पुरवठाधारक मे.केप्स फार्मा. मुंबई यांचा लघुत्तम दर र.रु.२१२६.८८ प्रति व्हायल (सर्व करासहीत) असा आहे. या दराने २८०० व्हायलस खरेदी केल्यास त्याकामी एकुण र.रु.५९,५५,२६४/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख पंच्चावन्न हजार दोनशे चौसष्ठ फक्त) (सर्व करासहीत) इतका खर्च झालेला आहे.सदरचे खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) नुसार मे.केप्स फार्मा. मुंबई यांचेकडुन कार्योत्तर करारनामा करुन खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७७९ विषय क्रमांक – २१

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७२३/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.78/17/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ मधील गांधीनगर, नुरमोहल्ला, जैन मंदिर, ज्योती इंग्लिश स्कूल, वसंतदादा पाटील परिसरातील रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.परमानंद ए कृपलानी नि.र.रू.56,01,175/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख एक हजार एकशे पंच्याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,27,425/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,27,425/- पेक्षा 28.62% कमी म्हणजेच र.रु.39,45,476/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.19,081/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.40,38,307/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८० विषय क्रमांक – २२

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७२२/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.78/19/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी, यशवंतनगर, उद्यमनगर परिसरातील रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.परमानंद ए कृपलानी नि.र.रू.56,24,882/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख चोवीस हजार आठशे ब्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,51,132/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,51,132/- पेक्षा 28.62% कमी म्हणजेच र.रु.39,62,398/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.25,653/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.40,61,801/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८१ विषय क्रमांक – २३
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७२१/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.78/16/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ खराळवाडी, नेहरुनगर व इतर भागातील ठिकठिकाणी रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.परमानंद ए कृपलानी नि.र.रू.56,18,901/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख अठरा हजार नऊशे एक फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55,45,151/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,45,151/- पेक्षा 28.62% कमी म्हणजेच र.रु.39,58,129/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.19,081/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.40,50,960/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८२ विषय क्रमांक – २४
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – ह क्षेत्रिय, पाणीपुरवठा
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/पापु/१/कावि/२२५/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.राष्ट्रीय हरीत लवाद (National Tribunal western Zone Pune) यांचे आदेशाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शेवाळेवाडी ग्रांमपंचायत, ता हवेली यांना १०,००० लि. क्षमतेच्या पाण्याच्या टँकरच्या दैनंदिन पाच ट्रिप्स देणेचे नियोजन करणेत आले आहे. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, लष्कर पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका यांनी, मा.महापालिका ठराव क्र.८०९ अन्वये पाणीपुरवठा विभागाकडील मीटर पाणीपट्टीच्या निवासी दराप्रमाणे सन २०१७-१८ पर्यंत ५४६(५४६० किलो लिटर) खेपासाठी र.रू २८.८८ प्रति किलो लिटर दराने र.रू.१,५७,६८४.८० सन २०१८-१९ पर्यंत १७४५(१७४५० किलो लिटर) खेपासाठी र.रू.३०.३२ प्रति किलो लिटर दराने र.रू.५,२९,०८४/- सन २०१९-२० पर्यंत २४८० (२४८०० किलो लिटर) खेपासाठी र.रू.३१.८४ प्रति किलो लिटर दराने र.रू.७,८९,६३२/- व सन २०२०-२१ साठी ३५९०(३५९०० किलो लिटर) खेपासाठी र.रू.३३.४३ प्रति किलो लिटर दराने र.रू.१२,००,१३७/- असे एकूण र.रू.२६,७६,५३,७८०/- इतकी रक्कम पुणे मनपाकडे जमा करणेस कळविले आहे. तरी सदर प्रकरणी पुणे मनपाने मागणी केलेली शेवाळवाडी येथे टँकरने पाणीपुरवठा करणेच्या बीलाची सुधारीत र.रू.२६,७६,२३७/- इतकी पुणे मनपास तातडीने अदा करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामासाठी चालु वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये कोणतीही तरतुद उपलब्ध नसलेने, पिं.चि.मनपाचे सन

२०२१-२२ चे अंदाजपत्रकातील "पाणीपुरवठा बिले" लेखाशिर्षामधून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८३ विषय क्रमांक – २५

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – आपत्ती व्यवस्थापन

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप.व्य/०१/कावि/१८२/२०२१, दि.१४/०६/२०२१

विषय - कोवीड–१९ संसर्गजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत दूर्गा ब्रिगेड यांचे स्वयंसेवकांचे कामकाजास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

विषय क्र.२५ चा विचार दि.०७/०७/२०२१ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८४ विषय क्रमांक – २६

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७२६/२०२१, दि.१५/०६/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.98/3/2020-21अन्वये प्रभाग क्र.८ मधील आवश्यक ठिकाणी पावसाळी गटरची सुधारणा करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवांक कन्स्ट्रक्शन नि.र.रू.37,32,688/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख बत्तीस हजार सहाशे अठ्ठयाऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,12,238/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,12,238/- पेक्षा 33.33% कमी म्हणजेच र.रु.24,74,949 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,251/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.20,450/- = एकुण र.रु.24,98,650/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८५ विषय क्रमांक – २७

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/०५/कावि/४४१/२०२१, दि.१५/०६/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 71) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८६ विषय क्रमांक – २८

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/७५/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०१.०३.२०२१ ते दि.२८.०३.२०२१ अखेरसंपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/१अ/कावि/७५/२०२१, दि.१६/०६/२०२१ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८७ विषय क्रमांक – २९

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/७३/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागाकडील माहे जानेवारी २०२१ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्य लेखा परीक्षक यांनी क्र.मुलेप/१अ/कावि/७३/२०२१, दि.१६/०६/२०२१ अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८८ विषय क्रमांक – ३०
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/७४/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागाकडील माहे फेब्रुवारी २०२१ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्य लेखा परीक्षक यांनी क्र.मुलेप/१अ/कावि/७४/२०२१, दि.१६/०६/२०२१ अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७८९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.उप आयुक्त (भांडार) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/३८४/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.उप आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा आरोग्य विभागाचे मागणीनुसार आवश्यक जंतुनाशक/दुर्गधीनाशक पायरोसीन ऑईल ISI MARK औषधे खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.04-01/2020-21 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.डॉल्फीन सेंल्स, पुणे यांचे प्रती लिटर दर र.रु.915 /- नुसार 1750 लिटरसाठी एकुण र.रु.**16,01,250/-** कमी करून दिलेले दर हे अंदाजपत्रकीय दर र.रु.16,10,000/- पेक्षा 0.54% ने कमी असल्याने ते स्विकृत करणेत आलेले असुन संबधीत पुरवठादारा बरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत आलेला आहे. तरी सदर खरेदीस येणा-या र.रू.**16,01,250/-** (अक्षरी र.रु.सोळा लाख एक हजार दोनशे पन्नास फक्त) च्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९० विषय क्रमांक – ३२
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/०४/कावि/५७९/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.आयुक्त, मा.महापौर, मा.अति.आयुक्त क्र.१ तसेच इतर पदाधिकारी आणि अधिकारी यांचे समवेत दिनांक २२.०३.२०२१ मिटींग आयोजीत केली असता झालेल्या चर्चे प्रमाणे टप्प्या टप्प्याने कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय ८०० बेड साठी दोन महिने कालावधीसाठी चालु करणेकामी आदेश देण्यात आले होते. दि.२५.०५.२०२१ पासुन बेडसंख्या कमी करणेत आली आहे. मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोसिटक सेंटर यांना देण्यात आलेल्या ८०० बेड

आदेशांपैकी ४०० बेड बंद करणेत आले होते आणि २०० बेड साठी टप्प्या टप्प्याने दिलेल्या आदेशांची मुदत अनुक्रमे २८.०५.२०२१ आणि ३१.०५.२०२१ रोजी पूर्ण होत होती. आयसीयु आणि ऑक्सीजन बेडची आवश्यकता लक्षात घेता दि. ०१.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१ पर्यंत १४० ऑक्सीजन युक्त बेड आणि ६० आयसीयु बेड चालु ठेवणेकामी त्यांना एकूण र.रु.१,३७,९३,४७२/- (अक्षरी र.रू.एक कोटी सदतीस लाख त्र्यान्नव हजार चारशे बाहत्तर फक्त) चे आदेश देणेत आले आहेत. मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोसिटक सेंटर यांना PMRDA कडील मुळ आदेशामध्ये नमुद केले प्रमाणे तसेच पुणे महानगरपालिकेकडील आदेशातील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहणार आहेत. वाढती रुग्णसंख्या विचारात घेता भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने दि.०१.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१ (३० दिवस) २०० बेडसाठी (ऑक्सीजन युक्त १४० बेड आणि आयसीयु ६० बेड) आदेश देण्यात आलेले आहेत. एकूण र.रु.१,३७,९३,४७२/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९१ विषय क्रमांक – ३३

दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७४०/२०२१, दि.१७/०६/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.98/4/2020-21 अन्वये प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी परिसरात देखभाल दुरुस्ती व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.आर.एम. एन्टरप्रायझेस नि.र.रू.29,97,908/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख सत्त्यान्नव हजार नऊशे आठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,25,608/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,25,608/- पेक्षा 41.13% कमी म्हणजेच र.रु.17,22,305/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.7,915/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.18,02,520/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९२ विषय क्रमांक – ३४
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७३९/२०२१, दि.१७/०६/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.98/2/2020-21 अन्वये प्रभाग क्र.२ मधील स्पाईन रस्त्यालगत से.नं.१६ राजेशिवाजीनगर गुलमोहर हौसींग सोसायटी ते जाधवसरकार चौकापर्यंतचा फुटपाथ विकसीत करणेकामी मे.आर.एम. एन्टरप्रायझेस नि.र.रू.41,39,845/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख एकोणचाळीस हजार आठशे पंचेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,67,545/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,67,545/- पेक्षा 40.90% कमी म्हणजेच र.रु.24,03,919/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.9,328/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.24,85,547/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९३ विषय क्रमांक – ३५
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/४/कावि/३१५/२०२१, दि.१५/०६/२०२१

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.९/२०२०-२१ अन्वये चिंचवड स्टेशन चौक ते थेरगाव फाटा डांगे चौक रस्ता मध्यदुभाजक सुशोभिकरण नुतणीकरण करणेकामी मे.जी.बी एन्टरप्रायजेस निविदा र.रू.३५,६४,४१०/- (अक्षरी र.रू.पस्तीस लाख चौसष्ट हजार चारशे दहा फक्त) पेक्षा ४.००% या कमी दराची निविदा मंजुर दराने २४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४,२१,८३४/- (अक्षरी र.रु.चार लाख एकवीस हजार आठशे चौतीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९४ | विषय क्रमांक – ३६
दिनांक – २३/०६/२०२१ | विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.सुरेश भोईर | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/५८१/२०२१, दि.१६/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता व पिंपरी चिंचवड शहरामधील वाढत्या कोविड १९ आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे अतिदक्षता विभाग (ICU) चालविणेकरीता असलेल्या मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता, मनपाचे रुग्णालयातील ICUबेड खाजगी संस्थेस चालविणेस देणेकामी Expression of Interst (EOI) क्र.4/2020-21 प्रसिध्द करणेत आलेले होते. सदर (EOI) निविदेकरीता मनपाचे हॉस्पिटल मधील बेड संख्येनुसार दर मागविणेत आलेले होते. त्यानुसार मे. रुबी अलकेअर सर्विसेस प्रा.ली यांचे वायसीएम हॉस्पिटल मधील 15 बेडसाठी सादर केलेले दर र.रु.11,999/- कमी करुन र.रु.7500/- प्रतिबेड/प्रतिदिन असा सुधारित दर दिला आहे. त्याच दराने वायसीएम हॉस्पिटल मधील ICU-1 व ICU-2 ( 15+15 बेड) एकूण ३० बेडचे काम करणेस तयारी दर्शविली असुन, सदरचा दर स्वीकृत करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.०१/०८/२०२० राजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. या प्रमाणे त्यांना आत्ता पर्यंत पुढील प्रमाणे कामकाज आदेश देणेत आले आहेत.

| अ.क्र. | कामकाज कालावधी | कामकाज आदेश क्र | आदेश रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दि.०९.०९.२०२० ते दि.१०.११.२०२० | आमुका/११/कावि/१९७/२०२० | २,०२,५०,०००/- |
| २ | दि.१०.११.२०२० ते दि.०९.०२.२०२१ | मसाभां/०४/कावि/९९ए/२०२१ | २,०२,५०,०००/- |
| ३ | दि.१०.०२.२०२१ ते दि.३१.०५.२०२१ | मसाभां/०४/कावि/३९९/२०२१ | २,५२,००,०००/- |

या प्रमाणे मे.रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना दिनांक ०१.०६.२०२१ ते ३१.०७.२०२१ पासुन दोन महीने (६१ दिवस) कालावधीसाठी आयसीयु ४८ साठी १५ बेड आणि आयसीयु ७० साठी १७ बेड असे एकूण ३२ बेडसाठी मुदतवाढ दिलेनंतर एकूण र.रु.१,४६,४०,०००/-(अक्षरी र.रू.एक कोटी शेहेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) पर्यंत कामकाज आदेश देणेत आले आहेत. एकूण र.रु.१,४६,४०,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९५ | विषय क्रमांक – ३७
दिनांक – २३/०६/२०२१ | विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/२०४/२०२१, दि.१७/०६/२०२१

विषय – क्रमिक पुस्तके खरेदीकामी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांना आगाऊ रक्कम अदा करणेबाबत.

विषय क्र.३७ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९६ विषय क्रमांक – ३८
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/३०७/२०२१, दि.१७/०६/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.३०/३३-२०२०-२१ अन्वये अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१० मध्ये दिवाबत्ती व्यवस्थेचे नुतनीकरण करणेकामी मे.एम.बी.इलेक्ट्रिक & कं. नि.र.रू.३२,३७,११८/-(अक्षरी र.रू.बत्तीस लाख सदतीस हजार एकशे अठरा फक्त) पेक्षा २३.७५% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९७९७ विषय क्रमांक – ३९
दिनांक – २३/०६/२०२१ विभाग – करआकारणी व करसंकलन
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/८/कावि/८४/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

